MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात



बीड जिल्ह्यामध्ये पाणी टंचाई अधिक भेडसावू लागली आहे. दिवसेंदिवस टंचाईग्रस्त गावांची संख्या वाढू लागली. १९३ गावे, १५२ वाड्या टंचाईच्या विळख्यात आल्या असून या ठिकाणी २३५ टँकरद्वारे पाण्याचा पुरवठा केला जावू लागलाय. मे एन्डपर्यंत हा आकडा आणखी मोठा होऊ शकतो. काही मोजक्या धरणातच पाणीसाठा शिल्लक राहिला. इतर सर्व धरणे कोरडे पडल्याने टँकरमध्ये पाणी भरायचे कुठून? असा प्रश्न प्रशासनाला पडू शकतो. जमीनीतील पाण्याची पातळी खालावल्याने विहिरी आणि बोअर कोरडे पडले.

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -२०९ | रविवार दि.२१ एप्रिल २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -209 | SUNDAY DT. 21 APRIL 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# मुंबईत भाजप प्रदेश कार्यालयाला भीषण आग



## सकाळपासून सुरू होते वेल्डिंगचे काम
## अग्निशमन दलाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल

मुंबई /प्रतिनिधी

एकीकडे निवडणुकीची रणधुमाळी सुरू असतानाच मुंबईतील भाजपच्या कार्यालयाला मोठी आग लागली आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. मुंबईच्या नरीमन पॉईंटमधील भाजप प्रदेश कार्यालयाला भीषण आग लागली आहे.

येथे सकाळपासूनच वेल्डिंगच्या काम केले जात होते. त्यावेळी अचानक आग लागल्याची माहिती समोर आली आहे. मुळात ही आग नेमकी कशामुळे लागली हे अद्याप स्पष्ट झालेले आहे. दरम्यान, अग्निशमन दलाला बोलावण्यात आले असून या ठिकाणी दोन बंब दाखल झाले असून ते आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न करत आहेत.

भाजप कार्यालयाला लागलेली आग

दुसरीकडे आज रविवार असल्याने कार्यालयात कोणीही नव्हते. परंतु, कार्यालयाच्या मागील बाजूस सोशल मीडिया हॅण्डल करणारे काही कर्मचारी होते. त्यांना त्वरीत बाहेर काढण्यात आले. हायप्रोफाईल एरिया असलेल्या नरिमन पॉईंट भागात आग लागल्याने सर्वत्र गोंधळ उडाल्याची माहिती समोर येत आहे.

मुंबईतील नरीमन पॉइंट या भागात भाजपचे महाराष्ट्र प्रदेश कार्यालय आहे. या कार्यालयात आज सकाळपासूनच नुतनीकरणाचे काम म्हणून काही ठिकाणी वेल्डिंगचे काम सुरू होते. त्यामुळे कार्यालयात अन्य कर्मचारी किंवा भाजप पदाधिकारी यांची कोणाचीही उपस्थिती नव्हती. मात्र, सायंकाळी चार वाजेच्या सुमारास अचानक शॉर्ट सर्किट झाल्यामुळे आग लागल्याची माहिती समोर आली.

अतिशय कमी वेळात आगीने रौद्ररुप धारण केले.

## केजमध्ये पाण्यासाठी नागरिकांचे हाल नगरपंचायत कार्यालयासमोर महिलांचा ठिय्या

केज : केज नगरपंचायत अंतर्गत पाणी पुरवठ्याचे योग्य नियोजन केले जात नसल्याने नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागू लागली. शहरातील लोंढे गल्ली, शिंदे गल्ली, अजिजपुरा या ठिकाणी पाणी नसल्याने येथील महिलांनी पाणी पुरवठ्याबाबत निवेदन दिले हाते, मात्र त्याची दखल घेतली गेली नसल्याने आज महिलांनी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन सुरू केले.

बीड जिल्ह्यासह मराठवाड्यात यंदा भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली. अनेक गावात टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागत आहे. शहराच्या ठिकाणी देखील पाण्यासाठी हाल होऊ लागले. शहरातील लोंढे गल्ली, शिंदे गल्ली, अजिजपुरा या भागात पाणी येत नाही. पंधरा दिवसांपूर्वी येथील नागरिकांनी येथील नागरिकांनी पाणी पुरवठ्यासंदर्भात नगरपंचायतकडे निवेदन दिले होते. निवेदन देऊनही



नगरपंचायतने दकल घेतली नसल्याने आज महिलांनी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन सुरू केले आहे. जोपर्यंत पाण्याचा प्रश्न मार्गी लावला जात नाही तोपर्यंत उठणार नसल्याचा आक्रमक पवित्रा महिलांनी घेतला. नगरपंचायतचे मुख्याधिकारी प्रभारी असल्यामुळे ते पाण्याच्या संदर्भात तितके गांभीर्याने घेत नसल्याचे दिसून येत नाही.

# पीएम मोदींनंतर प्रियंका गांधींची पुण्यात होणार मोठी सभा

## ४ लोकसभा मतदारसंघांचा करणार दौरा

मोदींच्या सभेनंतर काँग्रेसच्या स्टार प्रचारक प्रियांका गांधी या देखील पुणे दौऱ्यावर येणार आहेत. मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात ते पुणे दौरा करण्याची शक्यता आहे.

लोकसभा निवडणुकीसाठी सर्वच राजकीय पक्षांकडून जोरदार सभा, रॅली आणि बैठका सुरू आहेत. राज्यातील वेगवेगळ्या ठिकाणी राजकीय पक्षांच्या बड्या नेत्यांच्या प्रचारसभा होत आहेत. या महिन्याच्या अखेरीस पंतप्रधान नरेंद्र मोदी पुणे दौऱ्यावर येणार आहेत. ४० उमेदवारांच्या प्रचारासाठी ते पुण्यात सभा घेणार आहेत. मोदींच्या सभेनंतर काँग्रेसच्या स्टार प्रचारक प्रियांका गांधी या देखील पुणे दौऱ्यावर येणार आहेत. मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात ते पुणे दौरा करण्याची शक्यता आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, प्रियांका गांधी लवकरच पुणे दौरा करणार आहेत. मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात प्रियांका गांधी पुणे दौऱ्यावर येणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्यानंतर काहीच दिवसांत काँग्रेसकडून पुण्यात रॅली आणि सभेचे आयोजन करण्यात येणार आहे. मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पुणे जिल्ह्यातील ४ लोकसभा मतदारसंघासाठी महाविकास आघाडीच्या समर्थनार्थ प्रियांका गांधी यांचा दौरा असणार आहे. काँग्रेसच्या स्टार प्रचारक प्रियांका गांधी यांच्यासह सचिन पायलट हे देखील त्यांच्यासोबत सभेला उपस्थित राहणार आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी २९ एप्रिल रोजी पुणे दौऱ्यावर येणार आहेत. ४० लोकसभा मतदारसंघातील उमेदवारांच्या प्रचारासाठी मोदींची पुण्यामध्ये भव्य सभा होणार आहे. पीएम मोदींच्या या सभेकडे सर्वांचे लक्ष लागले आहेत. अशामध्ये आज काँग्रेसच्या स्टार प्रचारक प्रियांका गांधी या देखील पुणे दौऱ्यावर येणार असल्याची माहिती समोर आली आहे.

## अब की बार कोण खासदार ?
# छत्रपती संभाजीनगरात महायुती, महाआघाडी, एमआयएम भिडणार

छत्रपती संभाजीनगर : लोकसभेच्या छत्रपती संभाजीनगर मतदारसंघात महायुतीकडून शिवसेनेचे संदीपान भुमरे यांना उमेदवारी घोषित झाली. त्यामुळे लढतीचे चित्र स्पष्ट झाले. आता या मतदारसंघात महायुती, महाआघाडी, एमआयएम असा तिरंगी सामना असेल. दरम्यान, वंचित बहुजन आघाडीमुळे गणिते बिघडणार आहेत.

गेल्या लोकसभा निवडणुकीत हिंदू मतांमध्ये झालेल्या विभाजनाचा लाभ एमआयएम-वंचित बहुजन आघाडीचे इम्तियाज जलील यांना झाला होता. यावेळी एमआयएम आणि वंचित स्वबळावर लढत आहेत. दुसरीकडे शिवसेना-राष्ट्रवादीत फूट पडली. याचा परिणाम त्यांच्या संघटनेसह मतदारांवरही होणार आहे.तीनही पक्षांच्या उमेदवारांवर नजर टाकली, तर चंद्रकांत खैरे यांनी यापूर्वी चारवेळा



या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले. महायुतीचे संदीपान भुमरे हे विधानसभेच्या पैठण मतदारसंघातून पाचवेळा निवडून आले आहेत.

सध्या ते राज्याच्या मंत्रिमंडळात मंत्रीही आहेत. इम्तियाज यांचा गेल्या निवडणुकीत अनपेक्षित विजय झाला होता. पण, पाच वर्षांत त्यांनी खासदार म्हणून आपल्या कामाची छाप पाडली. त्यामुळे हे तीनही उमेदवार तगडे आहेत.

# पंकजाताईंना केवळ खासदार म्हणून नाही तर मंत्री म्हणून संसदेत पाठवा

## डॉ.योगेश क्षीरसागर यांचे आवाहन; बीडमध्ये स्वराज्य नगर परिसरात कॉर्नर बैठक

प्रतिनिधी । बीड

दि.२० : महायुतीच्या बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या माध्यमातून जिल्ह्यासह बीड मतदारसंघात केंद्र सरकारच्या योजना आणता येतील. पंकजाताईंना केवळ खासदार म्हणून नाही तर मंत्री म्हणून संसदेत पाठवावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले आहे.

महायुतीच्या बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ बीड शहरातील स्वराज्य नगर परिसरात शुक्रवारी (दि.२०) कॉर्नर बैठक पार पडली. यावेळी डॉ.योगेश क्षीरसागर हे बोलत होते. व्यासपीठावर राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस बप्पासाहेब घुगे, नगरसेवक गणेश वाघमारे, सरपंच अतुल मुंडे, शरद गदळे, दत्ताप्रसाद सानप, आमेर सिद्दीकी, अतुल काळे, दिशांत मोराळे, विकास यादव, माजेद कुरेशी, पवार, गणेश भोसले, राहुल मुंडे, संतोष पाळवदे, राजाभाऊ क्षीरसागर आदी उपस्थित होते.

डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले की, केंद्र सरकारच्या विविध योजना बीड शहरात देखील राबविल्या जात आहेत. त्यात प्रामुख्याने पंतप्रधान घरकुल योजना राबविली जात आहे. या माध्यमांतून शहरात ३ हजार गोर गरीब जनतेला हक्काचे घरकुल मिळाले. केंद्र सरकारच्या माध्यमातून शहरातून जाणाऱ्या मुख्य रस्त्यांची कामे झाली आहेत. महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना निवडून देऊन केवळ खासदार म्हणून नाही तर मंत्री म्हणून संसदेत पाठवायचे आहे. त्यांच्या माध्यमातून बीड शहरात मोठ्या प्रमाणात विकासाची कामे आणायची आहेत.



### पंकजाताईंना लीड देण्याचा शब्द


आवाहनाला प्रतिसाद देत स्थानिक नागरिकांनी देखील आपण आतापर्यंत आमच्या प्रभागात विविध विकासकामे करून न्याय दिला आता याची परतफेड आम्ही पंकजाताई मुंडे यांना जास्तीत जास्त मताधिक्याने निवडून आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचा शब्द दिला. या कॉर्नर बैठकीला स्थानिक नागरिक, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# बुलेट राजाने कुत्र्याला चिरडले शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

## मुक्या प्राण्याची सेवा करण्यास सदैव तत्पर,मुक्या प्राण्याला मदत लागल्यास कळवा... पेट शिल्ड टीम

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील पिपरगव्हाण रोड रात्री ११ च्या सुमारास भरधाव वेगाने बुलेट स्वराने कुत्र्यास जोराची धडक दिल्याने कुत्रा मरण पावल्याने कुत्र्याच्या मालकाने बुलेट राजावर शिवाजी नगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला.हा अपघात खुप भयानक होता.कुत्र्याचा एक पाय तुटून ३० फूट लांब उडून पडला,नागरिकांनी वाचवण्यासाठी खूप प्रयत्न केला परंतु जखम खोलवर व पाय तुटल्याने कुत्रा वाचू शकला नाही.बुलेटराजा दारूच्या नशेत होता.स्थानिक नागरिकांनी व खळगे यांनी पकडुन शिवाजी नगर पोलीसाच्या हवाली करून त्याच्या विरोधात



तक्रार देऊन गुन्हा नोंद करण्यात आला.

विपुल आबा खळगे यांच्या फिर्यादीवरून आरोपी नामे अभिषेक उद्दव काळे,महेश भगवान काळे यांच्या कलम २७९,३३६,३२३,५०६ नुसार गुन्हा नोंद करण्यात आला.गुन्हा नोंद झाल्याने आरोपीने फिर्यादीवर ,फिर्याद परत घ्या म्हणून दबाव टाकण्याचा प्रयत्न केल्यानेपेट शेल्टर फाउंडेशन बीड च्या सर्व प्राणीप्रेमींनी पोलीस अधिक्षक गोल्ड यांची भेट घेऊन निवेदन देऊन घडलेला प्रकार सांगितला.आरोपीस कठोर कारवाई करावी अशी विनंती करण्यात आली.त्यावर पोलिस उपअधीक्षक गोल्ड यांनी शिवाजी नगर पोलिस ठाणे प्रमुखांना आरोपीवर कारवाई करण्यास दूरध्वनी वरून सांगितले.त्या बद्दल टीमने गोल्ड साहीबाचे आभार व्यक्त केले. मुक्या प्राण्याची,पक्षांची सेवा करावी,त्यांना घराबाहेर ,छतावर पिण्यासाठी पाणी ठेवावे,बीड शहरातील नागरिकांना पेट शिल्ड च्या टीम कडून आवाहन करण्यात येते की बीड शहरात कुटे ही प्राण्याचा अपघात झाल्यावर आमच्या टीमची मो.(९९२३८१६००६) (९५५२४ ८८४८८) (९५५२७ ०६६०६) या नंबर वर संपर्क करा तत्काळ मदत केली जाईल.

# पंधराव्या शिवार साहित्य संमेलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे

## २३ एप्रिल रोजी होणार उद्घाटन

माजलगाव (प्रतिनिधी)

मराठवाडा साहित्य परिषद शाखा माजलगाव च्या वतीने आयोजित १५ व्या शिवार साहित्य संमेलनाचे उद्घाटन, परभणी येथील प्रसिद्ध साहित्यिक तथा पत्रकार आसाराम लोमटे यांच्या हस्ते ना. धो.महानोर साहित्य नगरी मध्ये दिनांक २३ मंगळवार रोजी होणार आहे. माजलगाव शहरापासून जवळ असलेल्या फुले पिंपळगाव शिवार नवीन मोंढ्याच्या पाठीमागे स्वागत अध्यक्ष तथा पत्रकार जगदीश पोफळे यांच्या शेतात ना. धो.महानोर साहित्य नगरी कडे सकाळी आठ वाजता ग्रंथदिंडीचे प्रयान होईल.ह.भ.प.रामराव महाराज फुलगे यांच्या हस्ते यावेळी ग्रंथाचे पूजन होणार आहे.

पंधराव्या शिवाय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रसिद्ध नाटककार व चित्रपट दिग्दर्शक तथा माजलगाव चे भूमिपुत्र प्रा. डॉ. अनिलकुमार साळवे यांच्या उपस्थितीमध्ये प्रसिद्ध साहित्यिक तथा पत्रकार आसाराम लोमटे, (परभणी) यांच्या हस्ते सकाळी ९.३० वाजता शिवार साहित्य संमेलनाचे उद्घाटन होईल.यावेळी शिवार साहित्य संमेलनाचे पूर्व अध्यक्ष राही फपाळ,स्वागत अध्यक्ष जगदीश पोपळे,मसाप शाखा माजलगाव चे पदाधिकारी यांची व्यासपीठावर उपस्थित असेल.सकाळी ११.३० वाजता कथाकथनाचे दुसरे सत्र सुरू होईल.प्रसिद्ध कथाकार विलास सिंदगीकर यांच्या बहारदार कथाकथनाच्या या कार्यक्रमाप्रसंगी अखिल भारतीय साने गुरुजी कथामला चे कोषाध्यक्ष,कांतराव गाजरे हे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित असतील.दुपारी १.०० वाजता च्या भोजन सत्रा नंतर, कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले असून प्राध्यापक संगीता जाधव यांच्या अध्यक्षतेखाली, दुपारी २.०० वाजता ते सुरू होईल.यावेळी माजलगाव तालुक्यातील अनेक मान्यवर कवींच्या कवितांचे सादरीकरण होईल,तर सायंकाळी ५.०० वाजता संमेलनाध्यक्ष प्रा. डॉ. अनिलकुमार साळवे यांच्या उपस्थितीमध्ये व समारोप सत्राचे प्रमुख पाहुणे नांदेड येथील प्रसिद्ध साहित्य प्रा.डॉ.वैशाली गोस्वामी यांच्या मनोगता नंतर या शिवार साहित्य संमेलनाचा समारोप होईल.साहित्यिक व साहित्यप्रेमी यांच्यासाठी मेजवानी, ठरणाऱ्या या शिवार साहित्य संमेलनात सहभागी होऊन नागरिकांनी आनंद घ्यावा अशी विनंती स्वागताध्यक्ष जगदीश पोपळे, मराठवाडा साहित्य परिषद शाखा माजलगाव चे अध्यक्ष मुकुंदराज सोळंके,प्रा.स्नेहल पाठक (उपाध्यक्ष),प्रा.डॉ.भाऊसाहेब राठोड (कार्यवाह), किशोर गुंजकर (कोषाध्यक्ष),बाळासाहेब झोडगे (सहकार्यवाह),प्रा.डॉ.उमेश साडेगावकर (सहकार्यवाह) यांच्यासह, कार्यकारणी ने केले आहे.




# गुरुकृपा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी कॉलेज मधील प्राध्यापक यांनी केलेल्या संशोधना बद्दल भारत सरकारचे पेटंट जाहीर

माजलगाव । प्रतिनिधी

२१ रक्तातील कोलस्टेरॉल पातळी मोजण्याच्या यंत्रा मध्ये सुधारणा करत माजलगाव तालुक्यातील गुरुकृपा इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी येथील तरुण संशोधक प्राध्यापक निखिल निळकंठ जाधव आणि प्रा. ऋषिकेश शिवाजीराव शेंडगे यांनी एक नवीन प्रकारचे डिवाईस डिझाईन केले आहे जे अत्यंत सोप्या पद्धतीने हाताळता येईल व रक्तातील कोलस्टेरॉलची पातळी शोधण्याचे काम करेल. या संशोधनासाठी त्यांनी दि. ०९/०२/२०२४ रोजी भारत सरकारच्या आय पी आय संस्थेच्या वेबसाईटवर नोंदणी अर्ज केला होता.

फार्मसी काऊन्सिल ऑफ इंडियाशी संलग्नित असणाऱ्या गुरुकृपा इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी येथील प्रा. जाधव आणि प्रा. शेंडगे यांनी औषधनिर्माणशास्त्र विषयातील अभ्यासक्रमामध्ये होणारे गतीशील बदल आणि संशोधन यात वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवून अनेक इंटरनॅशनल जरनल मध्ये रिसर्च पेपर (संशोधन लेख) प्रकाशित केले आहेत तसेच ते औषध निर्माण शास्त्रातील विद्यार्थ्यांना विशेषतः मराठवाड्यातील ग्रामीण भागातून शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांना संशोधनात्मक दृष्टिकोन ठेवून त्यांच्या सोबत



वेगवेगळे प्रयोग करून पाहतात. विद्यार्थ्यांना नविन औषधे व त्या संदर्भातील उपकरणे कसे बनवावे याबद्दल मार्गदर्शन करतात. त्यांनी बनवलेल्या पोर्टेबल ऑटो नालायझर फॉर डिटेक्शन ऑफ कोलेस्टेरॉल इन ब्लड लेव्हल या डिव्हॉईसची दखल घेत भारत सरकारच्या 'आय पी आय' (इंटेलेक्टूल प्रॉपर्टी इंडिया) संस्थेने त्यातील नावीन्य आणि विशेषता पाहता विविध पातळ्यांवर परीक्षणे नोंदवत नुकतेच त्यांचे स्वामित्व हक्क म्हणजे पेटंट ग्रँट केले.या बद्दल गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे संचालक डॉ. यशवंत राजेभोसले आणि गुरुकृपा इन्स्टिट्युट ऑफ फार्मसीचे प्राचार्य श्री. अमित बिंदू व सर्व स्टाफ यांनी प्रा. निखिल निळकंठ जाधव आणि प्रा. ऋषीकेश शिवाजीराव शेंडगे यांचा सत्कार करून अभिनंदन केले. या सत्काराच्या विशेष प्रसंगी सातत्याने सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात काम करणारे संचालक डॉ. यशवंत राजेभोसले यांनी प्राध्यापकांना कौतुकाची थाप देताना सांगितलेकी अश्या प्रकारचे राष्ट्रीय पातळीवरील संशोधन हे मराठवाड्यातील ग्रामीण भागातील सर्व सामान्य विद्यार्थ्यांना नवीन दिशा देण्याचे व संशोधनात्मक वृत्ती जोपासण्याचे काम करेल, तसेच यापुढील संशोधनासाठी व वैज्ञानिक उपक्रमासाठी ते कायम मदत करतील असे आश्वासन दिले आहे.

# डॉ.मेटे यांनी लोकसभा निवडणुकीतून

## माघार घेतल्याबद्दल आभारी आहे-हिंगे

**बीड : प्रतिनिधी**

शिवसंग्राम चे नेत्या डॉ.ज्योतीताई मेटे यांनी लोकसभा निवडणूक न लढवण्याचा घेतलेला निर्णय अभिनंदनिय व स्तुत्य आहे त्यांचे मी आभार व्यक्त करतो असे मत वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे यांनी व्यक्त केले. पुढे बोलताना हिंगे म्हणाले की जनतेमधून ज्योतीताई मेटे यांना उमेदवारी मिळावी अशी इच्छा होती त्यामुळे त्यांनी प्रशासकीय पदाचा त्याग केला शरद पवारांची भेट घेतली दोन वेळा चर्चा झाल्या मात्र पवारांनी ज्योतीताईंना उमेदवारी दिली नाही ज्योतीताईंना उमेदवारी मिळाली असती तर प्रशासकीय कामाचा दांडगा अनुभव असलेल्या ज्योतीताई चा जिल्ह्याच्या विकासात मोठा हातभार लागला असता स्वर्गीय विनायकरावजी मेटे साहेब यांच्यासोबत मला अनेक वर्ष काम करण्याची संधी मिळाली आमचे कौटुंबिक संबंध आहेत.



त्यामुळे ज्योतीताईंना उमेदवारी मिळाली असती तर वंचित बहुजन आघाडीचा त्यांना जाहीर पाठिंबा राहिला असता मात्र तसे घडले नाही आणि ज्योतीताई मेटे यांनी निवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय घेतला यामुळे उच्च विभूषित, उच्चपदस्थ,हुशार नेतृत्वापासून जिल्ह्याला लांब ठेवल्याची खंत वाटत आहे ज्योतीताई उमेदवार असत्या तर अशोक हिंगे पाटील उमेदवार दिसले नसते अशी ही अशोक हिंगे यांनी सांगितले मेटे ताई आणि मी एकाच कुटुंबातील आहोत दोघांच्या उमेदवारीमुळे मत विभाजना झाले असते मात्र ज्योतीताईने घेतलेल्या निर्णयामुळे आता मतवीभाजन टाळणार असून याचा फायदा वंचित आघाडीला होईल असे सांगितले ज्योतीताईने उदार मनाने, मोठेपणाने लोकसभेतून माघार घेतली त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे कमीच आहेत त्यांच्या या ऋणातून उत्तरदायी होण्यासाठी मी सतत प्रयत्नशील राहील असेही अशोक हिंगे यांनी सांगितले.

# गेवराई पोलीसांनी अवैध वाळू वाहतूक करणारे तीन हायवा पकडले



### एक कोटी २० लाख ५४ हजारांचा मुद्देमाल जप्त; तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई – बीड राष्ट्रीय महामार्गावरील नायरा पेट्रोल पंपाजवळ अवैध वाळू वाहतूक करणारे तीन हायवा गेवराई पोलिसांनी ताब्यात घेतले. ही कारवाई आज (दि.२०) पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास केली. या प्रकरणी तीन जणां विरूद्ध गुन्हा दाखल केला आहे. त्यांच्याकडून १ कोटी २० लाख ५४ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, नायरा पेट्रोल पंपाजवळ अवैधरित्या वाळू घेऊन तीन हायवा चाललेले आहेत, अशी माहिती गेवराई पोलीस निरीक्षक प्रविणकुमार बांगर यांना मिळाली होती. त्यानंतर पोलिस पथकाने पाठलाग करून तीन हायवा ताब्यात घेतले.

ही कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. नीरज राजगूरू यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराई पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रविणकुमार बांगर, सपोनि संतोष जंजाळ, पोउनि अशोक शेळके, पोउपनि शिवाजी भूतेकर, रामनाथ उगलमुगले, एएसआय सुरेश पारधी, संजय सोनवणे, शेखर हिंगावार यांनी केली.

# बुढे हो या जवान, सभी करे मतदान..!

## शिव शारदा पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांची मतदान जनजागृती रॅली

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील शिवाजीनगर गढी येथील शिव शारदा पब्लिक स्कूलच्या वतीने गेवराई येथे शाळेचे कर्तव्यदक्ष प्राचार्य कॅप्टन दास पिल्लई यांच्या नेतृत्वात दि. २० एप्रिल रोजी मतदान जनजागृती रॅली काढण्यात आली. तदारमध्ये पवित्र मतदानाचा हक्क बजावण्यासाठी, लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी विविध प्रकारचे घोषवाक्य लिहलेले फलक हातात धरून विद्यार्थ्यांनी बुढे हो या जवान, सभी करे मतदान, अधिक समृध्द भविष्यासाठी मतदान करा, उठा बाहेर पडा आणि मतदान करा, बदलाचे प्रतिनिधी व्हा मतदान करा, यासंह विविध घोषणा देऊन जनजागृती केली. यावेळी इयत्ता आठवी ते




दहावी च्या विद्यार्थ्यांनी मतदानाचा हक्क यावर आधारित अप्रतिम असे पथनाट्य सादर केले.

याप्रसंगी शाळेचे प्राचार्य कॅप्टन दास पिल्लई, सामाजिक शास्त्राचे विभाग प्रमुख विजय कोकाटे, हिंदी विभाग प्रमुख भरत सोनवणे, श्रीमती जया कांबळे, विनोद देशपांडे, संतोष सम्रत, वृषाली बोर्ड, गणेश देशमुख, शितल पवळ यांच्यासह शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होते.

# भीमजयंती मधील शिल्लक रक्कम २ लाख १० हजार बाळासाहेब आंबेडकर यांच्या खात्यात !

**प्रतिनिधी** @ अंबाजोगाई

अंबाजोगाईतील जयभीम नगर मोरेवाडी मधील डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती सालाबादा प्रमाणे भीमजयंती मोठ्या उत्साहात साजरी करत असते,या ही वेळेस ती खूप उत्साहात साजरी झाली.जयंती कार्यक्रमाला आठ दिवसाच्या भरगच्च कार्यक्रम व्याख्याने,सांस्कृतिक कार्यक्रम शेवटच्या दिवशी बाबासाहेबांच्या भव्य प्रतिमेची मिरवणूक व सर्वाना जेवण असे कार्यक्रम आयोजित केले होते त्या नंतर ही समाजातून जमा केलेली वर्गणी शिल्लक राहीली त्या शिल्लक निधीतून काय करायचा असा विचार ज्या वेळेस कमिटी समोर आला त्यावेळेस एकमताने आपल्या भीमजयंतीतील शिल्लक रक्कमसह एकूण २ लाख १० हजार रुपये आदरणीय बाळासाहेब आंबेडकर यांच्या खात्यात स्वाभिमान निधी म्हणुन जमा करण्याचा प्रस्ताव आला व तो एकमुखी निर्णय मान्य करून तात्काळ २ लाख १० हजाराचा निधी बाळासाहेब आंबेडकर यांच्या पक्ष वंचित बहुजन आघाडी ही आर्थिक मजबूत करून बळ देण्याच्या भावनेतून जमा करण्यात आला, या मुळे अंबाजोगाई,मोरेवाडी जयभीम नगर येथील उत्सव कमिटीच व नागरिकांच सर्व स्तरातून कौतुक व अभिनंदन होत आहे.

# तिन हायवावर गेवराई पोलिसांची कार्यवाई



गेवराई (वार्ताहार)

गेवराई बीड राष्ट्रीय महामार्गावरून अवैध वाळू वाहतूकीची माहीती गेवराई पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक प्रविणकूमार बांगर यांना गूप्त बातमीदाराने दिली तसेच सदर ठिकाणी हायवेवर तात्काळ पोलिस पथक पाठवून तिन हायवा वाळूने भरलेल्या ताब्यात घेण्यात आल्या आहेत तसेच ही कार्यवाई आज ( दि २० एप्रिल ) रोजी पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास करण्यात आली आहे.

याबाबद सविस्तर माहिती अशी की नायरा पेट्रोल पंपाजवळ अनाधीकृत वाळू घेऊन तिन हायवा चालल्या आहेत अशी माहिती गेवराई पोलिस निरीक्षक प्रविणकूमार बांगर यांना मिळाली तसेच सदर ठिकाणी पोलिस पथकाला कार्यवाईचे आदेश दिल्यानंतर सदरच्या हायवा पाठलाग करून गेवराई पोलिसांनी पकडल्या आहेत तसेच या प्रकरणी तिन आरोपी विरूद्ध गेवराई पोलिसांत गून्हा दाखल करण्यात आलेला आहे तसेच या कार्यवाईत १ कोटी २० लाख ५४ हजार रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे सदरची कार्यवाई बीड पोलिस अधीक्षक नंदकूमार ठाकूर,अप्पर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर,उप विभागीय पोलिस अधीकारी डॉ नीरज राजगूरू,यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराई पोलिस ठाणे प्रमुख प्रविणकूमार बांगर,सपोनि संतोष जंजाळ,पोउनि अशोक शेळके,पोउपनि शिवाजी भूतेकर,पोह रामनाथ उगलमुगले,एएसआय सुरेश पारधी,पोह संजय सोनवणे,पोह सरवदे,पोशी शेखर हिंगावार,यांनी केली आहे.

**आरोपी विरूद्ध गून्हा दाखल; १ कोटी २० लाखांचा मुद्देमाल जप्त**

# अल खैर फाऊंडेशन द्वारे सलग तिसरे वर्षी पोलिस भरती पूर्व लेखी क्लासचे आयोजन



बीड / प्रतिनिधी

अल खैर फाउंडेशन द्वारे सलग तिसऱ्यांदा पोलिस भरती पूर्व प्रशिक्षण लेखी क्लासचे आयोजन दिनांक २० एप्रिल २०२४ रोजी उत्साही लेक्चर आणि मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात मुख्य अतिथी म्हणून पुण्याचे प्रसिद्ध लेखक आणि संपादक फिरोज पठाण सर ,आणि अतिथी म्हणून डॉक्टर शेख शकील सर (अल् खैर फाउंडेशनचे फिजिकल ट्रेनर),पीएसआय खय्यूम कुरेशी साहेब , अंकुश पवार सर , इन्जि. अझहर इनामदार(अध्यक्ष अल खैर फाऊंडेशन) इत्यादी उपस्थित होते.अल खैर फाउंडेशनचा परिचय डॉ. शेख शकील सर यांनी केले आणि माननीय फिरोज पठाण सर (अभिनव प्रकाशन पुणे) यांच्याकडून पोलिस भरती बाबत अनमोल मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचा पुरेपूर लाभ घेतला आणि त्यांना मिळालेल्या मार्गदर्शनाचे कौतुक केले. मागील वर्षी घेतलेल्या बॅचचे १५ विद्यार्थ्यांची शासकीय सेवेत निवड झालेली आहे, अत्यंत अल्प फी मध्ये ही कोचिंग अल फाउंडेशन विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देत आहे, जेणेकरून गरजूवंत, कष्टाळू, मेहनती विद्यार्थी याचा फायदा घेऊन यश मिळवतील.

# बीड आकाशवाणीवर जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांची मुलाखत



बीड ।प्रतिनिधी

बीड आकाशवाणीवर बुधवारी २४ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता ३९ बीड लोकसभा मतदारसंघाच्या जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांची मुलाखत प्रसारित होणार आहे. आकाशवाणी बीड केंद्राच्या १०२.९ मेगाहर्टस् वर बुधवारी दिनांक २४ एप्रिल २०२४ रोजी सकाळी ११ वाजता ही मुलाखात प्रसारित केली जाईल. ही मुलाखात आकाशवाणीचे निवेदक गोपाल ठाकूर घेणार आहेत. ३९ बीड लोकसभा मतदार संघात निवडणुकीविषयक प्रशासनाने केलेली तयारी. अधिकाधिक मतदान व्हावे, यासाठी जिल्हा प्रशासन म्हणून राबवत असलेले विविध जागृतीपर उपक्रमांची माहिती या मुलाखतीत जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी देतील. बीड आकाशवाणीवरून प्रसारित होणारी ही मुलाखत मतदारांनी ऐकावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# उन्हाळी कुस्ती प्रशिक्षण शिबीरास मोठ्या संख्येने सहभागी व्हावे – पैलवान

पाटोदा / प्रतिनिधी

राज्यातील होतकरु,नवोदित मल्लांना कुस्ती प्रशिक्षण व व्यक्तिमत्व विकास, मार्गदर्शन करून त्यांचा शारिरीक,मानसिक,बौध्दिक विकास व्हावा यासाठी पाटोदा शहरातील सुप्रसिद्ध जय हानुमान तालिम येते भव्य उन्हाळी कुस्ती प्रशिक्षण शिबीर आयोजित केले आहे.या शिबीरातीलआंतरराष्ट्रीय स्तरावरील फ्रिस्टाईल, ग्रीको रोमन तसेच भारतीय पारंपारीक मातीतील कुस्ती प्रशिक्षण कुस्ती क्षेत्रातील विविध विषयावर तज्ञांचे मार्गदर्शन तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कुस्ती क्षेत्राती माहिती.योगा, प्राणायम, मल्लखांब, रनिंग, पी.टी. इ. प्रशिक्षण व्यक्तिमत्व विकास, स्पेकन इंग्लिश व इतर विषयांवर तज्ञांचे मार्गदर्शन शिबीरातील सुविधा उच्च दर्जाचे अनुभवी एन.आय.एस. कुस्ती प्रशिक्षक आंतरराष्ट्रीय स्तरावरील कुस्ती मॅट कुस्तीचा अत्याधुनिक मातीचा आखाडा तंत्रशुध्द प्रशिक्षणाची सुविधा उत्तम राहण्याची सोय प्रत्येक शिबीरार्थीना टि-शर्ट व शॉर्ट-पँट संपुर्ण परिसर सीसीटिव्ही निगरानीची सोय सुसज्ज खेळाचे मैदान व फुटबॉल, बास्केटबॉल, हॉलीबॉल,पासबॉल इ. सुविधा उपलब्ध आसुन शिबीरार्थी मल्लांनी येते वेळी सोबत अंथरून, पांघरून, जेवणाचे साहित्य (ताट, वाटी) स्पोटर्स किट तसेच लंगोट व शुज आवश्य आणावे.शिबीरार्थीने स्वतःच्या जबाबदारीवर शिबीरात भाग घ्यावा.एक वेळी भरलेली फी परत दिली जाणार नाही तसेच त्याजागी बदली मल्ल घेतला जाणार नाही.शिबीरातील आहार शिरा, पोहे, उपमा, दलिया, कडधान्य, सकाळचा नाष्टा केळी, उकडलेले अंडी दुपारचे जेवण २ भाज्या (सुकी व पातळ), चपाती, भात, लोणचे, सॅलाड शिबीर कालावधी २० एप्रिल



प्रॅक्टिस नंतर एनर्जी ड्रिंक व लिंबु सरबत बिर्याणी, पनीर भाजी, मिक्स व्हेज, सायंकाळचे जेवण चिकन/मटण/आंडा करी,चपातीसॅलाड व इतर रात्री झोपण्यापुर्वी दुध शिबीराचे मार्गदर्शक पै व आंतरराष्ट्रीय खेळाडू (सें. रेल्वे, पुणे) शिवछत्रपती पुरस्कार विजेते विशाल माने (सर) पै लखन राऊत (सर) राष्ट्रीय खेळाड़, पाटोदा महाराष्ट्र चैंपियन सहभागी होण्यासाठी खालील नंबरवर संपर्क करावे असे आवाहन शिवछत्रपती पुरस्कार विजेते पैलवान बाळासाहेब (आबा) आवारे यांनी केले आहे ९८५०६४८८९७ ९९२२३८६५७६

## दुचाकीचा भीषण अपघात

# दादासाहेब सांगुळे जागीच ठार

गेवराई / प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील उमापुर शेवगाव रोडवर पिकप आणि दुचाकीचा भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे, यामध्ये दोन सख्या भावांपैकी एकाचा मृत्यू झाला, तर एक गंभीररित्या जखमी झाला आहे. त्याला छत्रपती संभाजीनगर येथे उपचारासाठी तात्काळ हलवण्यात आले आहे. सदर घटनेने परिसरात मोठी हळहळ केली जात आहे.



गेवराई तालुक्यातील उमापुर ते शेवगाव रस्त्यावर गेवराई येथून सांगोळे बंधू हे दुचाकी क्रमांक एम एच २३ व्ही एच ७७ ३२ वरून उमापूर कडे जात होते. मात्र यावेळी गेवराई तालुक्यातील तळणेवाडी आणि माऊली संस्थान बोरी पिंपळगाव फाट्याजवळ आले असता, शेवगाव कडून अंबड कडे जाणारी मासे वाहतूक करणारा पिकप क्रमांक एम एच २१ बी एच ५७ ३७ यांचा भीषण अपघात झाला. सदर अपघात एवढा भीषण होता की, यामध्ये उमापूर येथील रहिवासी दादासाहेब सांगुळे यांचा जागीच मृत्यू झाला. तर त्यांचे बंधू उमेश सांगुळे हे गंभीररित्या जखमी झाले. त्यांना तात्काळ छत्रपती संभाजीनगर येथे उपचारासाठी हलवण्यात आले. तसेच दादासाहेब यांचा मृतदेह उमापूर येथील रुग्णालयात शिवविच्छेदनासाठी दाखल करण्यात आला. यावेळी माहिती मिळताच घटनास्थळी गेवराई ठाण्याचे दत्तू उबाळे शेखर हिंगावर यांनी घटनास्थळी धाव घेऊन, सदर घटनेचा पंचनामा केला. सदर घटनेने परिसरात मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे.



## अपघातात बळी गेलेल्यांच्या मित्रपरिवार

# व कुटुंबियांनी स्वखर्चाने धोकादायक खड्डे बुजवावेत !

### हि शासन आणि प्रशासनासाठी लाजिरवाणी बाब ; मुख्यमंत्र्यांना निवेदन-डॉ.गणेश ढवळे

**बीड : प्रतिनिधी**

बीड शहरातुन जाणाऱ्या धुळे ते सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील बार्शी रोडवरील धोकादायक खड्डा राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, जिल्हा प्रशासन आणि नगरपरीषद प्रशासनाच्या नाकर्तेपणामुळे अपघातात बळी गेलेल्या स्व.महेश राजेंद्र पाचंग्रे यांच्या मित्रपरिवार आणि कुटुंबियांनी त्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून स्वखर्चाने आज दि.२० एप्रिल शनिवार रोजी बुजवला.हि बाब शासन,जिल्हा प्रशासन यांच्या साठी अत्यंत लाजिरवाणी आणि बीडकरांसाठी संतापजनक घटना असुन याविषयी तिव्र नाराजी डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी मुख्यमंत्री, प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम मंत्री, सचिव, पालकमंत्री बीड यांना जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत निवेदनाद्वारे कळवली आहे.

बार्शी रोडवरील धोकादायक खड्यात पडुन अनेकांना अपंगत्व आलेले आहे.त्यातच दि.२८ सप्टेंबर रोजी या खड्ड्यात महेश राजेंद्र पाचंग्रे या घरातील कर्ता पुरुषाचा अपघात झाला होता.उपचार सुरू असतानाच दि.६ आक्टोबर रोजी त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.तरीही प्रशासनाला जाग आली नाही.सामाजिक कार्यकर्ते यांनी तात्पुरत्या स्वरूपात खड्डा बुजवून घेतला होता.नुकत्याच आठवडाभरापूर्वी झालेल्या अवकाळी पावसाने पुन्हा खड्डा उघडा पडला असुन आठवडाभरात ३ जणांचा अपघात झाला असुन सुदैवाने जिवितहानी झाली नाही.वारंवार निवेदन देऊनही प्रशासनाला जाग न आल्याने अखेर आज दि.२० एप्रिल शनिवार रोजी स्व.महेश राजेंद्र पाचंग्रे यांचे कुटुंबीय आणि पापनेश्वर मित्रमंडळ यांनी सिमेंट क्रॉक्रिट सहाय्याने स्वखर्चाने खड्डा बुजवला असुन एकंदरीतच लोकप्रतिनिधी शासन, महामार्ग प्राधिकरण, नगर परिषद प्रशासन यांच्या संवेदनहिनता आणि निष्क्रियतेबद्दल बीडकरांमध्ये तिव्र संतापाची भावना आहे.

# भगरे गुरूजींची भागवत कथा म्हणजे अध्यात्माचा प्रसाद - माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

बीड / प्रतिनिधी

अध्यात्मिक परंपरा असलेल्या नवगणराजुरी गावांमध्ये भागवताचार्य अतुलशास्त्री भगरे गुरुजी यांनी गेल्या सहा दिवसापासून आपल्या सुश्राव्य वाणीतून भागवत कथेचे महत्व आणि महात्म्य भाविकांना सांगितले. कथेच्या माध्यमातून एक प्रकारचा अध्यात्माचा प्रसादच दिला असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.

नवगण राजुरी येथे स्व.सुरेखाताई रविंद्र क्षीरसागर यांच्या द्वितीय पुण्यस्मरणार्थ हेमंत रविंद्र क्षीरसागर यांनी आयोजित केलेल्या श्रीमद् भागवत कथेच्या समारोप प्रसंगी, कथाकार वे.शा.सं. भागवताचार्य अतुलशास्त्री भगरे गुरुजी यांनी गेल्या सहा दिवसात आपल्या अमूल्य वाणीतून भागवताचे महात्म्य आणि महत्व पटवून दिले आहे. पुण्यात्माच्या पुण्यस्मरणानिमित्त ही कथा ऐकण्याचा योग आला. अध्यात्माची परंपरा असलेले नवगण राजुरी गाव असून इवलेसे रोप लावियेले द्वारी त्याचा वेलू गेला गगनावरी, यानुसार राजुरीचेही महत्व आता वाढले आहे. स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी प्रत्यक्ष परमेश्वर देखील आईविना भिकारी होता. आपण मात्र आईच्या सानिध्यात, संस्कारात वाढलो आहोत हे आपले भाग्य आहे. वसा आणि वारसा चालवत असताना समाजाला बरोबर घेऊन आपल्या परिवाराने काम केले आहे. भागवत कथेतून अतुलशास्त्री यांनी विविध प्रसंग उभे केले असून आयुष्य जगण्यासाठीची शिदोरी हवी ती या ठिकाणी दिली आहे. परमेश्वर सेवेपेक्षा आई-वडिलांची सेवा सर्वात महत्त्वाची असते त्यानुसार हेमंत ने ही कथा आयोजित करून राजुरी सारख्या अध्यात्मिक परिसरात भाविकांना अध्यात्माचा प्रसादच दिला आहे. कुटुंबाच्या नात्यांची गुंफण विस्कटणार नाही याची सर्वांनी काळजी घ्यायला हवी, धनसंपत्तीपेक्षा कर्तव्य महत्त्वाचे असते हेच या कथेतून बोध घेण्यासारखे आहे. भगरे गुरुजींनी या कथेतून हा अध्यात्माचा प्रसादच दिला असल्याचे माजी मंत्री जयदत्त




क्षीरसागर यांनी म्हटले आहे. कथेनंतर यजमान हेमंत क्षीरसागर व सौ.प्रिया हेमंत क्षीरसागरसह माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, सौ. प्रतिभाताई क्षीरसागर यांनी महाआरती देखील केली, यावेळी राजुरीचे सुपुत्र महंत अमृत आश्रम स्वामी महाराज यांना शासनाकडून पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा जाहीर सत्कारही करण्यात आला.

आजच्या कथेच्या सुरुवातीला वे.शा.सं. भागवताचार्य भगरे गुरुजी म्हणाले की, आईच्या द्वितीय पुण्यतिथीचा कार्यक्रम कुटुंबापुरता मर्यादित न ठेवता हेमंत क्षीरसागर यांनी सर्वांना बरोबर घेऊन सर्वांना आपलं कुटुंब म्हणून उत्तम आयोजन करत भागवत कथा भव्य दिव्य केली आहे. जिवंत असेपर्यंत आपल्यामुळे दुसर्याच्या डोळ्यात अश्रू येऊ देऊ नका माता-पित्यांच्या सेवेत जे फळ प्राप्त होते ते इतर कुठल्याही सेवेत मिळत नाही असे सांगून त्यांनी मातापित्यांची सेवा करण्याचे आव्हान केले. यावेळी हेमंत क्षीरसागर, महंत अमृत महाराज यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी रंग माझा वेगळा या मालिकेतील अभिनेत्री व भगरे गुरुजी यांची कन्या अनघा भगरे, ह.भ.प. नारायण महाराज डिसले,ह भ प विनायक महाराज पाटांगणकर, रविंद्र क्षीरसागर, डॉ विठ्ठल क्षीरसागर, विजूताई महिंद्रे, रोहित क्षीरसागर, जगदीश काळे, दिनकर कदम, सुभाष क्षीरसागर, विलास विधाते, नानासाहेब काकडे, सुधाकर मिसाळ, डॉ.राजा मचाले, एम.ए. राऊत, सखाराम मस्के, प्रा.किशोर काळे, जीवन जोगदंड, दिलीप खांडे, आसाराम गायकवाड, प्रकाश उपरे, राजेंद बहीर, रामचंद्र बहीर, मुळूक गुरूजीख, समाधान गुरूजी, सागर गुरूजी, कृष्णा महाराज, विनायक गुरूजी यांच्यासह नवगण राजुरी परिसरातील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अध्यात्मिक परंपरा असलेल्या नवगणराजुरी गावांमध्ये भागवताचार्य अतुलशास्त्री भगरे गुरुजी यांनी गेल्या सहा दिवसापासून आपल्या सुश्राव्य वाणीतून भागवत कथेचे महत्व आणि महात्म्य भाविकांना सांगितले. कथेच्या माध्यमातून एक प्रकारचा अध्यात्माचा प्रसादच दिला असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.

नवगण राजुरी येथे स्व.सुरेखाताई रविंद्र क्षीरसागर यांच्या द्वितीय पुण्यस्मरणार्थ हेमंत रविंद्र क्षीरसागर यांनी आयोजित केलेल्या श्रीमद् भागवत कथेच्या समारोप प्रसंगी, कथाकार वे.शा.सं. भागवताचार्य अतुलशास्त्री भगरे गुरुजी यांनी गेल्या सहा दिवसात आपल्या अमूल्य वाणीतून भागवताचे महात्म्य आणि महत्व पटवून दिले आहे. पुण्यात्माच्या पुण्यस्मरणानिमित्त ही कथा ऐकण्याचा योग आला.



# मराठ्यांना ओबीसी आरक्षणात येऊ नका म्हणता

## मग ओपनच्या मतदारसंघात तुम्ही का आलात? : जरांगे

सर्वच राजकीय पक्षांनी मला लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याचे आवाहन केले होते. मी लोकसभा निवडणुकीत उभा राहिलो असतो तर प्रचंड मतांनी निवडून देखील आलो असतो. पण मला मराठा समाजाला न्याय मिळवून द्यायचाय म्हणून मी मूळ प्रश्नापासून दूर जाणार नाही, असे जरांगे म्हणाले.


डॉ. धनाजी चव्हाण, परभणी : मराठा समाज ओबीसीमधून आरक्षण मागत असताना ओबीसींचे सर्वच नेते मराठा समाजाला ओबीसीमध्ये घेऊ नका म्हणून विरोध करत होते. मराठा समाजाला स्वतंत्र आरक्षण द्या पण ओबीसीमधून नको असेही म्हणत होते. मग आता लोकसभेच्या निवडणुकीमध्ये ओपन मतदारसंघ असताना ओबीसी नेत्यांना येथून का उभे राहायचे आहे? असा सवाल मनोज जरांगे पाटील यांनी उपस्थित केला. सध्या मराठवाड्यामध्ये बीडमधून पंकजा मुंडे आणि परभणीमधून महादेव जानकर हे ओबीसी उमेदवार म्हणून उभे राहिले आहेत. ज्याला पाडायचे त्याला पाडा पण तो पुन्हा कधी उभा राहता कामा नये, असे जरांगे पाटील म्हणाले. मनोज जरांगे पाटील हे आज दिवसभर परभणी जिल्हा दौऱ्यावर होते. परभणीच्या यशवाडी येथे त्यांनी उपस्थित ग्रामस्थांशी संवाद साधला.

जरांगे पाटील म्हणाले की, मराठा समाजाला आरक्षणापासून ७० वर्ष या राजकारण्यांनी वंचित ठेवला आहे. मला मराठा आरक्षणासाठी काम करण्याची संधी मिळाली आहे. सहा कोटी मराठा समाजाला न्याय देण्यासाठी मी प्रयत्न करत आहे. शंभर दोनशे रुपये घेऊन या राजकारण्याच्या नादी लागू नका. आपल्या लेकरा बाळांच्या आयुष्याचा प्रश्न आहे. राजकारणाच्या नादी लागू नका मराठा आरक्षणासाठी एकसंध राहा मला सर्वच राजकीय पक्षांनी लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याचे आवाहन केले होते. मी लोकसभा निवडणुकीत उभा राहिलो असतो तर प्रचंड मतांनी निवडून देखील आलो असतो. मला दिल्लीमध्ये घर मिळाले असते, मला पगार सुरू झाला असता. मी आणि माझी बायको मिळून दिल्लीमध्ये गुलाबजामुन खाल्ले असते पण मी हे केलं नाही. कारण माझ्या मराठा समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी मी निवडणुकीच्या रिंगणात उतरलो नाही,

## मनोज जरांगे यांचा महायुती सरकारवर घणाघात

राज्य सरकारने माझ्यावर चौकशी समिती नेमली आहे. एसआयटी अशा लोकांवर नेमली जाते, ज्याने हजार कोटी रुपयांचा घोटाळा केला असेल किंवा कुणाचे खून केले असतील. पण मी तसे काहीही केले नाही. पण तरी देखील या सरकारने माझ्यावर एसआयटी नेमली. आता तर मला राज्यातून हद्दपार करण्यासाठी हे सरकार प्रयत्न करत आहेत. पण मी या सरकारला भीक घालणार नाही. मराठा आरक्षण जोपर्यंत मिळत नाही तोपर्यंत लढत राहणार आहे. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळाल्यास मराठा समाजातील बहुतांश मुलं तुम्हाला नोकरीमध्ये दिसतील. नोकऱ्यांमध्ये मराठा युवकांचा टक्का वाढलेला दिसेल. आत्ताच मिळालेल्या दहा टक्के आरक्षणामुळे मराठा समाजाची लेकरं पटापट नोकरीला लागत आहेत, असेही जरांगे म्हणाले.

# श्री क्षेत्र भगवानगडाचा ९० वा नारळी सप्ताह




**श्री संत भगवानबाबांनी प्रारंभ केलेला ९० वा नारळी अखंड हरिनाम सप्ताह यावर्षी घोगस पारगांव येथे संपन्न होत आहे. त्यानिमित्त श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती, ह.भ.प. न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांनी लिहिलेला विशेष लेख......**

संत महापुरुषांचं एकत्रीकरण म्हणजे अखंड हरिनाम सप्ताह. विचारांची देवाणघेवाण, तत्त्वज्ञानावर चर्चासत्र, अनेक महापुरुषांना अभिप्राय व्यक्त करण्याचे व्यासपीठ. सामान्यांचे एकत्रीकरण, एकत्र जेवण, निर्व्यसनीपणाचे प्रशिक्षण, जीवनाविषयी गंभीरता, ईश्वराविषयी प्रेम, जीवन आणि संसाराची अनित्यता, सुखदुःखाची जाण, स्वतः विषयीचे ज्ञान व जगण्याचं भान देणारा हा अखंड हरिनाम सप्ताह असतो. संतांच्या ग्रंथांचे न समजणारे सिद्धांत इथे समजावून सांगितले जातात. भारताचा इतिहास व संस्कृतीचे विवेचन केले जाते. ऋषींचं मत व साधूंचं मनोगत इथे आचरणात आणण्याचे शिकविले जाते. आरोग्याची काळजी व योग प्रशिक्षण यात दिलं जातं. देव, भक्त व नाम ही त्रिवेणी म्हणजे नाम सप्ताह होय. इथे वाल्याचा महर्षी वाल्मीक होतो. हीच संतांची प्रतिज्ञाही आहे.

सप्ताहाचे वैशिष्ट्य म्हणजे

प्रत्येकाला अधिकाराप्रमाणे आचरणाची मुभा दिली जाते. जात, पात, धर्म हे वारकरी संप्रदायात पहिल्यापासून नाहीत. इथे जो देवावर प्रेम करतो, तीच एक जात मानली जाते. स्त्री आणि पुरुष हा भेद नाही. इथे कोणत्याही अभंगावर विश्लेषणे होतात. श्री संत सावता महाराज, श्री संत चोखोबाराय महाराज, श्री संत सेना महाराज, श्री संत गोरोबाकाका, श्री संत नरहरी महाराज, श्री संत नामदेव महाराज, श्री संत लतीफ शाह, श्री संत सजन कसाई हे सर्व एकतत्त्वाचे व एकमताचे आहेत. त्यांची जात व धर्म कोणता आहे हे पाहिलं जात नाही. नैतिक आचरण, त्याग व ईश्वराविषयी प्रेम हेच सिद्धांत महत्त्वाचे आहेत. धर्मांधता नको; पण अंतकरण मोठं पाहिजे. उदारता पाहिजे. दिखाऊ प्रेम नको; देखणं प्रेम पाहिजे. त्याग हा बोलण्यात नसून वागण्यात दिसला पाहिजे. स्वतःचं अस्तित्व वाढविण्यासाठी हा सप्ताह नाही. अपितु संप्रदायाचा, संतांचा प्रचार व प्रसार यासाठी हा नामसप्ताह असतो. चांगल्याचा, चांगल्यासाठी मेळावा आहे. या संत सभेत जर संतांपुढे गीता सांगण्याचा योग आला तर त्याला ईश्वर साक्षात्कार होतो. साक्षात्कारापेक्षाही तो देवाचा आवडता होतो.

तैसा भूतळी आघवा श्र आन न देखे पांडवा श्रश्र
जो गीता सांगे मेळावा श्र भक्तजनांचा श्रश्र
(ज्ञानेश्वरी १८-१५१६)
मग तयाचेनि पाडे श्र पडियंते मजपुढे श्रश्र
नाहीचि गा मागेपुढे श्र न्याहाळीता श्रश्र
(ज्ञानेश्वरी १८-१५२२)

हा सप्ताह विधिपूर्वक होत असतो. पहाटे काकडा भजन असते. हे अभंग स्वतंत्र आहेत. या अभंगाला काकड्याचे अभंग व भूपाळ्या असे नाव आहे. या अभंगात जीवनाचे व भगवंताचे विशिष्ट पद्धतीचे वर्णन वेगळ्या छंदातून व चालीतून असते. पहाटे मन शांत असताना कोणता विचार मनात असावा, हा विचार करून हे अभंग तयार झाले आहेत. यानंतर सर्वांसाठी ज्ञानेश्वरी पारायण. साधारणतः पंधराशे ओव्या तीन तासांत व्हाव्यात. थोडा अल्पोपहार व नंतर गाथाभजन. हे गाथाभजन फार शांत पद्धतीने करायचे असते. इथे गाण्याला कमी महत्त्व असते. अभंग हे खोलवर रुजले पाहिजेत, एवढ्याच प्रमाणात संगीत असते. भजनाच्या अंतिम टप्प्यात विशिष्ट पद्धतीने नृत्य असते याला 'पाऊल्या' असे म्हणतात. यात नृत्याचे अनेक प्रकार आहेत. मृदंगाच्या साक्षीने, टाळांच्या गजरात भगवंताचे नाम चिंतन करीत तालात 'कोट' आदी खेळले जातात. यातच फुगडी, प्रतिस्पर्धात्मक खेळ,खो -खो, घुमरी आदी खेळ रंगतात. जेवण आणि थोड्या विश्रांतीनंतर ज्ञानेश्वरी प्रवचन, भागवत किंवा रामायण इत्यादी निरुपणे होतात. हरिपाठ, जेवण, रात्री कीर्तन, कीर्तनानंतर गावोगावीचे जागर होतात. हे एक आध्यात्मिक शिबिरच असते. सतत संसाराचा विचार करणार मन थोडं तत्त्वज्ञानाकडे वळतं. आपण का जन्माला आलो? आपलं काय कर्तव्य आहे? याची जाण निर्माण होते. कोणत्या सिद्धांतावर आपण विचार करावा, हे या सप्ताहात आपल्याला कळतं. अचानक जीवनाला धोका झाला, तर मनुष्याचा मानसिक तोल जाऊ शकतो. दुःखाची तीव्रता अधिक होऊ शकते. हेच जर संत संगतीतून अगोदर कळलं तर मनुष्य सावध होतो.



नाशिवंत देह जाणार सकळ श्र
आयुष्य खातो काळ सावधान श्रश्र
(स.सं.गा.तु.२५२३)

सज्जनांचा मेळावा असणारा हा सत्संग सर्वांसाठी लाभदायक आहे. गावाची एकता साधणारा, जगण्याचं भान देणारा, मनुष्याला सन्मार्ग दाखविणारा असा हा नाम सप्ताह असतो. महाराष्ट्रात सर्वत्र हा साजरा करतात. सर्व संतांचं अनुमोदन असून, सर्व फडकरी, मठकरी, संस्थानिक हा उपक्रम राबवतात. मराठवाड्यात श्री संत भगवानबाबांनी नारळी सप्ताह प्रारंभ केला. परिसरातील सर्व गावांनी सात दिवस एका गावात एकत्रित यायचं. हे गाव दरवर्षी बदलत असतं. ज्या गावाला हा सप्ताह करायचा असेल, त्यांनी नारळाची मागणी करायची. त्याचं वर्ष ठरवून तो नारळ दिला जातो, म्हणून या अखंड हरिनाम सप्ताहाला नारळी सप्ताह असे म्हणतात. चैत्रशुद्ध त्रयोदशी ही आपल्या नारळी सप्ताहाच्या प्रारंभाची तिथी ठरलेली असते. आज या सप्ताहाचं स्वरूप फार विराट झालं आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून विद्वान व भक्तमंडळी या सप्ताहासाठी मोठ्या प्रमाणात येत असतात. त्यांच्या जेवणाची व्यवस्था ज्या गावाने नारळ घेतले आहे ते गांवकरी करीत असतात. त्याला परिसर पूर्ण सहकार्य करत असतो. या सप्ताहाचे हे ९० वे वर्ष आहे. बीड जिल्ह्यातील शिरुर तालुक्यापासून २० किलोमीटर उत्तरेला व श्री क्षेत्र भगवानगडाच्या पूर्व बाजूला गडाच्या पायथ्याशी केवळ ३ किलोमीटर अंतरावर असणाऱ्या घोगस पारगांवमध्ये २१ ते २८ एप्रिल यादरम्यान हा सप्ताह संपन्न होत आहे. काल्याच्या दिवशी नामांकित मंडळी उपस्थित राहणार आहेत. आपणही सर्व भाविक निमंत्रित आहात.

फोडिले भांडार धन्याचा हा माल
तेथे मी हमाल भारवाही श्रश्र
(संत तुकाराम गाथा - ३३५)

# माजलगावात बजरंगबप्पांनी घेतली 'शहर किंग' सहाल चाऊस यांची भेट

## शहराचा 'माऊस' हाताळणाऱ्या 'चाऊस' यांच्या निर्णयाची उत्सुकता

## स्वयंघोषित पुढाऱ्यांच्या पायाखालची सरकली जमीन

माजलगाव :प्रतिनिधी

बीड लोकसभा निवडणुकीचा रंग दिवसेंदिवस रंगताना दिसत आहे. अत्यंत अटीतटीच्या सामन्यात होणारी ही निवडणूक राज्याचे लक्ष वेधून आहे.दरम्यान आपले पारडे जड करण्याच्या उद्देशाने महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंगबप्पा सोनवणे यांनी'शहर किंग'म्हणून परिचित असणारे माजी नगराध्यक्ष सहाल चाऊस यांची सदिच्छा भेट घेतली. भेटीतील चर्चा गुलदस्त्यात आहे. परंतु शहरातील सामाजिक राजकीय घडामोडीच्या किबोर्डचा 'माऊस'हाताळणारे'चाऊस' भेटीनंतर काय भूमिका घेतात याची उत्सुकता आहे.दरम्यान चाऊस यांच्या राजकिय निर्णयाचा कल बप्पांना मिळन्याची शक्यता आहे. त्यामुळे तालुक्यात मताचा फायदा बप्पांना होनार आहे.तर या निर्णयाने शहरातील स्वयघोषित पुढाऱ्यांच्या पायाखालची जमीन मात्र सरकताना दिसत आहे.गेल्या अडीच तीन वर्षांपासून सहाल चाऊस राजकारणात न्यूट्रल आहेत.आपला



व्यवसाय आणि आपले सामाजिक कार्य या व्यतिरिक्त ते कुठल्याही राजकीय व्यासपीठावर वावरताना दिसत नाहीत.दरम्यानच्या काळात त्यांनी आ.प्रकाश सोळंके यांच्यासोबत समझोता केला असल्याच्या अफवा ऐकायला मिळत होत्या.ते या पक्षासोबत जातील.ते,त्या पक्षा सोबत जातील आशा अनेक राजकीय आटकली लावण्याचे पेवही फुटले होते.परंतु चाऊस यांची भूमिका'न्यूट्रलच'दिसत होती. शहरातील राजकारनावर, समाजमनावर त्यांची मोठी पकड आहे.त्यामुळे त्यांच्या राजकीय भूमिकेकडे अनेकांचे लक्ष लागून आहे.लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तरी ते राजकीय निर्णय घेतील अशी चर्चा आहे. परंतु अद्यापही ते मौन आहेत.अशा मनस्थितीत महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंगबप्पा सोनवणे यांनी चाऊस यांची भेट घेतली.

दरम्यान भेटीतील चर्चा गुलदस्त्यात आहे.या भेटीनंतरच्या काळात चाऊस कुठली राजकीय भूमिका घेतील?ते बजरंगबप्पा सोनवणे यांना फक्त लोकसभा निवडणूकी पुरते सहकार्य करतात का?का शरद पवार यांच्या पक्षात प्रवेश करतात?का उद्धव ठाकरे यांची मशाल हाती घेतात?का शिंदे सेनेचा धनुष्य उचलतात?का राजकारणात न्यूट्रलच राहतात?अशा अनेक आटकली लावल्या जात आहेत. परंतु येत्या दोन चार दिवसात ते आपलं मौन सोडून राजकीय निर्णय घेण्याची शक्यता आहे.त्यामुळे शहराचा'माऊस'हाताळणाऱ्या 'चाऊस'यांच्या राजकीय निर्णयाबाबद तालुक्याच्या राजकीय वर्तुळात उत्सुकता लागून आहे. त्यांच्या राजकीय निर्णयानंतर शहरातील राजकीय घडामोडीत मोठा बदल होण्याचे संकेत आहेत. आजच्या राजकीय,सामाजिक वातावरणाचा कल पाहता ते बजरंगबप्पांना सहकार्य करतील असा अंदाज आहे.असे झाल्यास मताचा मोठा फायदा बप्पांना होऊ शकतो अशी चर्चा आहे.दरम्यान चाऊस यांच्या राजकीय निर्णयाच्या हालचालीने शहरातील अनेक स्वयंघोषित पुढाऱ्यांच्या पायाखालची जमीन सरकताना दिसत आहे.


बीड लोकसभा निवडणुकीचा रंग दिवसेंदिवस रंगताना दिसत आहे. अत्यंत अटीतटीच्या सामन्यात होणारी ही निवडणूक राज्याचे लक्ष वेधून आहे.दरम्यान आपले पारडे जड करण्याच्या उद्देशाने महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंगबप्पा सोनवणे यांनी'शहर किंग'म्हणून परिचित असणारे माजी नगराध्यक्ष सहाल चाऊस यांची सदिच्छा भेट घेतली.





# शिरूर कासार तालुक्यातील वारणीचा सुपुत्र डॉ. श्रीकांत केदार झाला एमबीबीएस!

शिरूर कासार ।प्रतिनिधी

शिरूर कासार तालुक्यातील वारणी गावचा सुपुत्र डॉ. श्रीकांत प्रभाकर केदार याने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव येथून इंटरशिप पूर्ण करून एमबीबीएसची पदवी घेतली असल्याने संपूर्ण गावात त्याचे अभिनंदन होत आहे.कै. शंकरराव गुणवंतराव केदार यांचे कुटुंब गेल्या कित्येक वर्षांपासून शेतीनिष्ठ शेतकरी, व वारकरी सांप्रदायिक,म्हणून परिचित होत.डॉ.श्रीकांत चे वडील श्री. प्रभाकर शंकरराव केदार हे आदर्श शिक्षक ह्मणून कार्यरत आहेत.आई एक उत्तम ग्रहणी आहेत. मात्र डॉ. श्रीकांत याने आई वडिलाचे संस्कार,गरिबीची जान,मेहनतीच्या आणि बौद्धिक क्षमतेच्या जीवावर एमबीबीएसचे शिक्षण पूर्ण करून पदवी प्रदान केल्याने त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. डॉ. श्रीकांत केदार अगदी बालपणापासून अत्यंत हुशार , मेहनती आणि धाडसी विद्यार्थी होता. डॉक्टर श्रीकांत याचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वारणी येथे झाले असून माध्यमिक शिक्षण प्रगती विद्यालय ,बीड येथे तर उच्च माध्यमिक शिक्षण लातूर येथे पूर्ण केल्यानंतर वैद्यकीय शिक्षण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात जळगाव येथे पूर्ण केले आहे. डॉ. श्रीकांत लहानपणापासूनच अतिशय हुशार आणि कुशाग्र बुद्धिमत्तेचा असल्याने त्याला ग्रामीण भागातील जाण असल्याने यापुढे पदव्युत्तर शिक्षण घेऊन, ग्रामीण भागातील गरीब, वंचित ,दलीत,आदिवासी रुग्णांची सेवा करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला आहे. जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात पदवीधर समारंभ नुकताच १६ एप्रिल २०२४ रोजी संपन्न झाला असून महाराष्ट्राचे महामहीम राज्यपाल मा. रमेश बैस. सर आरोग्य विद्यापीठ नाशिक येथील उप कुलगुरू डॉ.माधुरी कानीटकर मॅडम.तसेच जळगावचे जिल्हाधिकारी मा.आयुष प्रसाद, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय जळगाव येथील अधिष्ठाता.डॉ.गिरीश ठाकूर सर .व महाविद्यालयाचे शिक्षक वृंद यांच्या उपस्थितीमध्ये डॉ. श्रीकांत केदार यास पदवी प्रदान करण्यात आली.

डॉ. श्रीकांत केदार यांना पदवी मिळाल्यामुळे वारणी गावचे प्रथम नागरिक सरपंच ज्ञानदेव अण्णा केदार, उपसरपंच केशव केदार, केशवराज संस्थांचे मठाधिपती बाबा साहेब महाराज बडे , भास्करराव नागरगोजे, सर्व ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ, पंचायत समितीचे माजी सभापती बाबुराव केदार, अनिल केदार,डॉ.पद्माकर घुले.आई विजया प्रभाकर केदार, बहिण प्रणिता धनंजय वाघ, मामा ब्रम्हानंद बिनवडे, मनीषा भागवत केदार, अर्चना किरण केदार, पूजा किशोर केदार, पार्वतीबाई शंकरराव केदार, शोभा महादेव केदार, उषा भीव सेन नागरगोजे, उषा भाऊसाहेब नागरगोजे, कविता शिवाजीराव शिरसाट, सोनाली प्रदीप कुटे, सीमा आनंतराव केदार यांच्यासह नातेवाईक, मित्रपरिवार व नागरिकांनी डॉ. श्रीकांत केदार यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# महादेव चांगिरे विद्युत सुरक्षा दुत पुरस्काराने सन्मानित

पुणे ।प्रतिनिधी

मोजे वाघबेट ता. परळी वैजनाथ गावचे सुपुत्र यांना जनता वसाहत कमिटी पुणे कडून कर्तव्यनिष्ठ विद्युत सुरक्षा दुत पुरस्काराने सन्मानित करण्यात आले महावितरण पर्वती विभागातील पेशवे पार्क उप विभागाचे वरिष्ठ तंत्रज्ञ महादेव शिवाजी चांगिरे यांनी जनता वसाहत मध्ये उल्लेखनीय आणि कर्तव्यनिष्ठ कार्यासाठी समाजाप्रती तत्पर सेवा आणि महावितरण प्रतिमा उंचावण्याचे काम केले आहे. आपल्या भागात कर्तव्यनिष्ठ विद्युत सुरक्षा दूत पुरस्कार मिळविणारे जनता वसाहत मधिल पहिलेच कर्मचारी आहेत. जनता वसाहत मध्ये यांनी पोल मेंटनस, सर्व्हिस वायर बदलणे, सुरक्षिततेचे बॅनर प्रत्येक चौका चौकात लाऊन जनजागृती करण केले, वॉट्साप ग्रुप उघडुन जनता मधी प्रत्येक गली तील लोकांना ग्रुप मध्ये ऍड करून त्या ग्रुप द्वारे लोकांना नो लाईट कंप्लेंट , स्पार्कींग कंप्लेंट, शॉक , ची कंप्लेंट असो अस्या वेग वेगळ्या महावितरणच्या समस्या यांनी वॉट्साप ग्रुप द्वारे सोडवल्या ग्रहकाला ऑनलाईन कंप्लेंट करायची कधी गरज भासू दिली नाही फक्त चांगिरे यांना एक कॉल केला की चांगिरे वायरमन हे अवग्या १० मिनिटात यउन कंप्लेंट काढतात याच कामाची पावती म्हणून यांना जनता वसाहत कमिटी कडून हा पुरस्कार देऊन यांना सन्मानित करण्यात आले या वेळी महावितरणचे महादेव चांगिरे, दीपक गायकवाड, राजू चेडे,



सुनील कोळी, समाधान गुडघे, ज्ञानेश्वर परळी , दीपक नेहरे, तुषार डांगे, प्रवीण ढवळे, आयुब देशमुख आधी कर्मचारी उपस्थित होते जनता वसाहत कमिटी कडून पुरस्कार देण्यात आला या वेळी सूरज लोखंडे, समीर पवार, मनोज चव्हाण, शिवाजी पवार, आधी पदाधिकारी पदाधिकारी उपस्थित होते .

# बीड आकाशवाणीवर जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांची मुलाखत



बीड ।प्रतिनिधी

बीड आकाशवाणीवर बुधवारी २४ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता ३९ बीड लोकसभा मतदारसंघाच्या जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांची मुलाखत प्रसारित होणार आहे. आकाशवाणी बीड केंद्राच्या १०२.९ मेगाहर्टस् वर बुधवारी दिनांक २४ एप्रिल २०२४ रोजी सकाळी ११ वाजता ही मुलाखात प्रसारित केली जाईल. ही मुलाखात आकाशवाणीचे निवेदक गोपाल ठाकूर घेणार आहेत. ३९ बीड लोकसभा मतदार संघात निवडणुकीविषयक प्रशासनाने केलेली तयारी. अधिकाधिक मतदान व्हावे, यासाठी जिल्हा प्रशासन म्हणून राबवत असलेले विविध जागृतीपर उपक्रमांची माहिती या मुलाखतीत जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी देतील. बीड आकाशवाणीवरून प्रसारित होणारी ही मुलाखत मतदारांनी ऐकावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# गल्ली ते दिल्ली तुतारी वाजणार -बजरंग सोनवणे

२२ एप्रिल ला भरणार अर्ज ,आघाडीच्या पत्रकार परिषदेत गुलालाची मूठ एकवटली

लोकसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीने एकजुटीने काम करण्यासाठी वजन बांधली आहे त्यामुळे बीड लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीचा विजय कोणी रोखू शकणार नाही असे मत महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी व्यक्त केले आहे बीड लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी कालपासून अधिसूचना काढण्यात आलेली आहे २२ एप्रिल रोजी महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून बजरंग सोनवणे हे उमेदवारी भरणार आहेत याबाबत सविस्तर माहिती देण्यासाठी महाविकास आघाडीतल्या घटक पक्षांनी व स्थानिक स्तरावर महाविकास आघाडीला पाठिंबा देणाऱ्या संघटनांच्या प्रमुख नेत्यांची पत्रकार परिषद संपन्न झाली राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष आमदार संदीप भैया क्षीरसागर राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष राजसाहेब देशमुख शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गणेश वरेकर माजी आमदार सय्यद सलीम भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नेते कॉम्रेड नामदेव चव्हाण मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे नेते एडवोकेट अजय बुरांडे आप चे अध्यक्ष अशोक येडे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस बाळासाहेब घुमरे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे माजीआमदार उषाताई दराडे डीपीआयचे प्रदेशाध्यक्ष अजिंक्य चांदणे वकील आघाडीच्या नेत्या हेमा पिंपळे राष्ट्रवादीचे नेते नवीदुज्जम्मा सय्यद भाई मोहन गुंड प्रा प्रशांत पवार आदी धन्यवाद नेते हजर होते यावेळी बोलताना बजरंग सोनवणे यांनी बीड लोकसभा मतदारसंघातील सर्व राजकीय व सामाजिक स्थिती पत्रकारांसमोर विशद केली रेल्वेचा प्रश्न आरक्षणाचा प्रश्न युवकांच्या बेरोजगारीचा प्रश्न महिलांच्या व मुलींच्या अनेक प्रश्नाबाबत विद्यमान नेतृत्व उदासीन आहे बीड जिल्ह्यातल्या सर्व जाती धर्मातल्या लोकांना परिवर्तनाची गरज वाटत असल्यामुळे माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्यावर शरद पवार यांनी विश्वास व्यक्त केल्याचे त्यांनी सांगितले यावेळी बोलताना



कॉम्रेड नामदेव चव्हाण यांनी देशातली एकाधिकारशाही व हुकूमशाही नष्ट करण्यासाठी आम्ही इंडियाच्या माध्यमातून महाविकास आघाडीत सामील झालेलो आहोत मार्क्सवादी कमिट पक्षाचा व भाकपाचा या जिल्ह्याला मोठा इतिहास राहिलेला आहे त्यामुळे एडवोकेट अजय बुरांडे व आम्ही पूर्णपणे महाविकास आघाडीच्या सोबत असल्याचे त्यांनी नमूद केले यावेळी गणेश वरेकर यांनी शिवसेना ही गाव पातळीवरील कार्यकर्त्यांची मजबूत टीम आहे पूर्ण ताकतीने ती बजरंग सोनवणे यांना निवडून आणण्यासाठी प्रयत्न करेल असे सांगितले तर काँग्रेस पक्षाच्या नेत्या रजनीताई पाटील व अशोक पाटील यांनी बीड जिल्ह्यात सर्वप्रथम काँग्रेस पक्षाचा जिल्हास्तरीय कार्यक्रम घेऊन प्रत्यक्ष उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या समोरच कार्यकर्त्यांना एकजुटीने कामाला लागण्याचे आदेश दिले आहेत अशी माहिती राष्ट्रीय काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजसाहेब देशमुख यांनी दिली आहे यावेळी बोलताना परमेश्वर सातपुते व रत्नाकर शिंदे यांनी शिवसेना ही संपूर्ण जिल्ह्यात महाविकास आघाडीच्या कामात सक्रिय झालेली असल्याचे सांगितले तर देशात सुरू असलेल्या हुकूमशाहीला विरोध करणाऱ्या आम आदमीच्या नेत्यांनी जेलमध्ये जाणे पसंत केले मात्र या सरकारची एकाधिकारशाही सहन केली नाही त्यामुळे आमचे नेते जो आदेश देतील त्या आदेशाप्रमाणे देशातल्या सत्ता परिवर्तनात आम आदमीचा वाटा असल्याचा उल्लेख जिल्हाध्यक्ष अशोक येडे यांनी केला तर शेतकरी कामगार पक्ष हा कायम महाविकास आघाडीचा घटक राहिला आहे त्यामुळे महाविकास आघाडीची जी निश्चित अशी भूमिका ठरेल त्यात आम्ही सहभागी आहोत असा उल्लेख बाळासाहेब घुमरे यांनी केला यावेळी बीड जिल्ह्यातल्या संपूर्ण राजकीय वातावरणाचा विचार करता महाविकास आघाडी ही सशक्तपणे निवडणुकीला सामोरे जात आहे अशी माहिती राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष संदीप क्षीरसागर यांनी दिली व पत्रकार परिषदेचा समारोप केला...

# माजलगावात होणार अंजली जैन यांचा 'जैन भागवती दीक्षा महोत्सव'

## प.पू.प्रतिभाकंवरजी म.सा. यांची पत्रकार परिषदेत माहिती वयाच्या पंधराव्या वर्षात 'अंजली' अंगीकारणार संयम मार्ग

**माजलगाव ।प्रतिनिधी**

**जैन धर्माचा प्रचार व प्रसार करण्यासाठी, भगवान महावीरांचे उपदेश जन माणसांपर्यंत पोहोचविण्यासाठी व स्वत:च्या आत्म कल्याणसह जनकल्याण करण्यासाठी छत्रपती संभाजीनगरची अंजली जैन वयाच्या १५ व्या वर्षी 'जैन भागवती दीक्षा' ग्रहण करून संयम मार्ग अंगीकारणार आहे. हा दीक्षा महोत्सव दिनांक २८ एप्रिल २०२४ रोजी माजलगाव येथील शिवप्रताप मंगल कार्यालय येथे सकाळी ९ वाजता होणार आहे अशी माहिती प.पू.प्रतिभाकंवरजी म.सा. यांनी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत दिली.**

पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, दीक्षा म्हणजे पंच महावृत्तांचे पालन करणे आहे जसे की, सत्य, अहिंसा, अचौर्य, ब्रह्मचर्य, अपरिग्रह या पंचमहाव्रतांचे कठोर पालन करण्यासाठी अंजली जैन ही जैन दीक्षा ग्रहण करत आहे. जैन दीक्षा ग्रहण करण्यासाठी कुठल्याही वयाची, जात किंवा धर्माची अट नसल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. अंजली यांनी जैन धर्मातील विविध आगमांचे अभ्यास, प्रतिक्रमण, जैन धर्माचे विविध सूत्र पाठांतर केल्यानंतर व संयम मार्गावर जाण्यासाठी परिपक्व झाल्यानंतर त्यांचा दीक्षा महोत्सव माजलगाव येथे संपन्न होत असल्याचे त्यांनी सांगितले.

माजलगाव नगरी ही खूप पुण्यवान आहे त्याचे कारण की, इथे २२ साधू संतांच्या उपस्थितीमध्ये व या सर्वांच्या आशीर्वादाने अंजली यांचा दीक्षा महोत्सव संपन्न होणार आहे. माजलगावात मागील १०० वर्षांत कधीही असा कार्यक्रम झालेला नाही व भविष्यात कधी होईल याची शाश्वती नसल्याचेही त्यांनी सांगत दिनांक २४ एप्रिल पासून २८ एप्रिल पर्यंत होणाऱ्या विविध धार्मिक कार्यक्रमांमध्ये बहुसंख्येने उपस्थित राहून न भूतो न भविष्यती असा अंजली जैन यांचा होणारा दीक्षा महोत्सव आपल्या डोळ्यांनी पाहण्यासाठी व अंजलीला आशीर्वाद देऊन तिचे अभिनंदन करण्यासाठी सर्वांना उपस्थित राहण्याचे आवाहन प.पू.प्रतिभाकंवरजी म.सा. यांनी केले आहे.



यावेळी पत्रकार परिषदेला प.पू.सौरवमुनी म.सा., प.पू.गौरवमुनी म.सा. आदी ठाणा ४, प.पू.शालिभद्रजी म.सा., प.पू.प्रणवमुनीजी म.सा., प.पू.प्रफुल्लाजी म.सा., प.पू.सिद्धीसुधाजी म.सा. आदी ठाणा १६ तसेच श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघाचे अध्यक्ष सचिन रेदासनी, राजेंद्र दुगड, कुशल लोढा, संजय रेदासणी, धीरज खारिया, कुणाल श्रीश्रीमाळ, श्रीपाल मुनोत, प्रतिक ललवाणी आदी उपस्थित होते.


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT